MHST170003312026

मा. अतिरीक्त सत्र न्यायाधीश, वडूज, ता. खटाव जि.सातारा

यांचे न्यायालयात.

फौजदारी जामीन अर्ज क्रः ७१/२०२६

हर्षद युवराज बुधावले व.१ .. अर्जदार

विरुध्द

महाराष्ट्र शासन मार्फत– .. सामनेवाला
म्हसवड पोलीस स्टेशन

| प्रकरणाचा तपशिल (**Case Details**) | | |
|---|---|---|
| एफ.आय.आर.नंबर व दिनांक | : | १०७/२०२६ दि.०४/०५/२०२६ |
| पोलीस स्टेशन, जिल्हा व राज्य | : | म्हसवड पो.स्टे., जिल्हा सातारा, महाराष्ट्र |
| लागु कलमे | : | भारतीय न्याय संहिता कलम ३१०(२), ३१२, ३०९(६), ३५१(२), ३(५), ३३१(४) अन्वये |
| कमाल शिक्षा | : | १४ वर्षापर्यंत |
| | | |

| | | |
|---|---|---|
| **ताबा व प्रक्रिया पालन Custody and Procedural Compliance** | | |
| अटक दिनांक | : | ०७/०५/२०२६ |
| एकुण कोठडी कालावधी | : | १ महिना १५ दिवस |
| **खटल्याची स्थिती Status of Trial** | | |
| प्रकरणाची स्थिती | : | आरोपपत्र दाखल झाले नाही. |
| आरोपपत्रातील साक्षीदारांची एकुण संख्या | : | -- |
| अभियोग पक्षाने तपासलेल्या साक्षीदारांची संख्या | : | -- |
| **गुन्हेगारी पार्श्वभूमी** | | |
| | **एफ.आय.आर.नं.** | -- |
| | **कलमे-** | -- |
| | **स्थिती-** | -- |
| **मागील जामीन अर्ज** | | |
| **न्यायालय-** | : | -- |
| खटला क्र.- | : | |
| खटल्याचा निकाल- | : | |
| **सक्तिची प्रक्रिया Coercive Procedures** | | |
| कोणता अजामीनपात्र वॉरंट जारी करण्यात आला होता का? | : | -- |
| फरार गुन्हेगार म्हणुन घोषीत केले आहे का? | : | -- |

सदरचा अर्ज अर्जदारांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, कलम ४८३ अन्वये जामीन मिळण्यासाठी दाखल केलेला आहे.

२. अभियोग पक्षाचे कथन थोडक्यात असे आहे की, फिर्यादी प्रल्हाद हा त्याच्या पत्नीसह राहतो. दिनांक ०३/०५/२०२० रोजी रात्री तो घरी झोपलेला असताना सुमारे १२.३० वाजण्याच्या दरम्याने तीन अनोळखी इसमांनी त्याच्या घराचा दरवाजा उघडून घरात प्रवेश केला. ते फिर्यादी झोपलेल्या ठिकाणी आले व त्याच्या गळ्यात असलेले सोन्याचे दोन बदाम व दोन पेट्या काळ्या दोऱ्यात ओवलेल्या जबरदस्तीने ओढल्या. त्यामुळे फिर्यादीला जाग आली. त्यावेळी पूर्ण बाह्यांचा टी–शर्ट घातलेल्या एका इसमाने फिर्यादीच्या अंगावरील गोधडी त्याच्या तोंडावर ओढली व तो त्याच्या अंगावर उभा राहिला. दुसरा इसमदेखील त्याच्या अंगावर उभा राहिला. दरम्यान, एका व्यक्तीने त्याला मारहाण करून त्याच्या गळ्यातील काळा दोरा कशानेतरी कापला व गळ्यातील सोन्याचे बदाम, दोन पेट्या तसेच शर्टच्या खिशातील रु. ७,२००/– रोख रक्कम जबरदस्तीने काढून घेतली. त्यानंतर तिघांनीही फिर्यादीस लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. फिर्यादीने आरडाओरडा केल्यावर त्याला धमकी देण्यात आली व पुन्हा मारहाण करण्यात आली.

३. फिर्यादीचा आरडाओरडा ऐकून त्याची पत्नी जागी झाली व तिनेही आरडाओरडा केला. त्यावेळी हाफ बाह्यांचा टी–शर्ट घातलेल्या एका व्यक्तीने तिला लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. तसेच एका व्यक्तीने फिर्यादीस पकडून ठेवले असताना दुसऱ्या व्यक्तीने त्याच्या पत्नीच्या गळ्यातील मंगळसूत्र व कानातील फुले जबरदस्तीने काढून घेतली. त्यानंतर सर्व आरोपींनी घरातील लाईट बंद करून तेथून पलायन केले. चोरीस गेलेल्या दागिन्यांची एकूण किंमत सुमारे रु. ७,२००/– इतकी होती.

४. याबाबत फिर्यादीने म्हसवड पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यावरून गुन्हा क्रमांक १०७/२०२६ हा भारतीय न्याय संहिता कलम ३१०(२), ३१२, ३०९(६), ३५१(२), ३(५), ३३१(४) अन्वये अज्ञात आरोपींविरुद्ध दाखल करण्यात आला.

तपासादरम्याने सदर गुन्ह्यात अर्जदारांसह इतर व्यक्तींची नावे आरोपी म्हणून निष्पन्न झाली. त्यापैकी या अर्जदारांना दिनांक ०७/०५/२०२६ रोजी अटक करण्यात आली. अर्जदारांनी सदर जामीन अर्ज खालील कारणास्तव दाखल केला आहे.

१. अर्जदार क्रमांक १ व २ यांना सदर गुन्हा मान्य व कबूल नाही.

२. अर्जदारांनी कोणताही गुन्हा केलेला नसून त्यांच्याविरुद्ध दाखल करण्यात आलेली फिर्याद खोटी व बनावट आहे.

३. अर्जदारांवर त्यांच्या संपूर्ण कुटुंबाची जबाबदारी आहे. त्यांना दीर्घकाळ कारागृहात ठेवण्यात आल्यास त्यांच्या शेती व मजुरीच्या व्यवसायाचे नुकसान होणार आहे.

४. अर्जदार क्रमांक १ व २ हे अर्जात नमूद केलेल्या पत्त्यावर कायमस्वरूपी वास्तव्यास असून तेथे त्यांची स्थावर व जंगम मालमत्ता आहे. तसेच त्यांचे वयोवृद्ध आई–वडीलदेखील त्यांच्यासोबत राहतात.

५. अर्जदार हे कुटुंबातील कर्ते पुरुष असून शेती व मजुरी करून स्वतःचा तसेच कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. कुटुंबाची संपूर्ण जबाबदारी त्यांच्यावर आहे. जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालाशी त्यांचा कोणताही संबंध नाही.

६. सदर गुन्ह्याचा तपास बहुतांशी पूर्ण झालेला असून अर्जदार क्रमांक १ व २ यांच्याकडून आणखी काही जप्त करण्याचे नाही.

७. अर्जदार हे सवयीचे गुन्हेगार नसून त्यांच्याविरुद्ध यापूर्वी कोणताही गुन्हा दाखल अथवा प्रलंबित नाही.

८. अर्जदारांना जामिनावर मुक्त करताना न्यायालय ज्या अटी व शर्ती घालील त्यांचे पालन करण्यास ते तयार आहेत.

त्यामुळे अर्जदारांनी त्यांची जामिनावर मुक्तता करण्याची मागणी केलेली आहे.

५. या कामी अन्वेषण अधिकाऱ्यांनी निशाणी ९ येथे आपले म्हणणे दाखल करून खालील कारणास्तव अर्जास हरकत घेतलेली आहे :–

१. सदर गुन्ह्याचा तपास अद्याप सुरू असून अर्जदारांची जामिनावर मुक्तता केल्यास तपासावर परिणाम होऊ शकतो.

२. अर्जदारांची गुन्ह्याच्या अनुषंगाने ओळख परेड घेणे आवश्यक आहे.

३. अर्जदारांची जामिनावर मुक्तता केल्यास साक्षीदारांच्या जिवितास धोका निर्माण होण्याची शक्यता आहे.

४. अर्जदार हे फिर्यादी, साक्षीदार व गुन्ह्याशी संबंधित व्यक्तींवर स्वतः किंवा हस्तेपरहस्ते दबाव आणण्याची शक्यता आहे.

५. अर्जदारांची जामिनावर मुक्तता केल्यास ते न्यायालयात सुनावणीच्या वेळी उपस्थित राहणार नाहीत.

६. अर्जदारांना जामिनावर मुक्त केल्यास ते पुराव्यामध्ये छेडछाड करण्याची शक्यता आहे.

७. अर्जदारांना जामिनावर मुक्त केल्यास ते पुन्हा अशाच प्रकारचा गुन्हा करण्याची शक्यता आहे.

अन्वेषण अधिकाऱ्यांनी जामीन अर्ज फेटाळण्याची मागणी केलेली आहे.

६. विद्वान अतिरिक्त सरकारी वकील यांनी निशाणी १० कडे पुरसिस देऊन अन्वेषण अधिकाऱ्यांनी मांडलेले म्हणणे स्वीकारलेले आहे.

७. अर्जातील कथने, अन्वेषण अधिकाऱ्यांचे म्हणणे, उपलब्ध कागदपत्रे तसेच दोन्ही बाजूंचा युक्तिवाद विचारात घेता खालील मुद्दे माझ्या अवलोकनार्थ उपस्थित होतात व त्याबाबतचे माझे निष्कर्ष पुढीलप्रमाणे आहेत :–

| अ. क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | अर्जदार मागणी करीत असल्याप्रमाणे जामीन मिळण्यास पात्र आहेत काय? | अटी व शर्ती वर होय. |

| | | |
|---|---|---|
| २ | अंतिम आदेश कोणता? | अर्ज अंतिम आदेशाप्रमाणे शर्तींवर मंजूर केला आहे.. |

## <u>कारणमिमांसा</u>

**<u>मुद्दा क्रमांक १ व २ करिताः</u>**

८. याकामी मूळ फिर्यादीचे अवलोकन करता असे दिसून येते की, त्यामध्ये आरोपींची नावे नमूद करण्यात आलेली नव्हती. कारण प्रथमदर्शनी फिर्यादी आरोपींना ओळखत नव्हता. याकामी अन्वेषण अधिकाऱ्याच्या म्हणण्यावरून असे दिसून येते की, आरोपी क्रमांक ५ व ७ म्हणजेच याकामीचे अर्जदार तसेच विधिसंघर्षग्रस्त बालक आरोपी क्रमांक ६ यांचा तांत्रिक विश्लेषण व गोपनीय बातमीदारामार्फत शोध घेण्यात आला. त्यानंतर गुन्ह्याच्या तपासकामी त्यांच्याकडे चौकशी करण्यात आली असता त्यांनी सदर गुन्हा केल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांना दिनांक ०७/०५/२०२६ रोजी अटक करण्यात आली. तसेच विधिसंघर्षग्रस्त बालकास बाल न्याय मंडळ, सातारा यांच्यासमोर हजर करण्यात आले.

९. अन्वेषण अधिकाऱ्याच्या म्हणण्यावरून असेही दिसून येते की, याकामीचा अन्य आरोपी महादेव बुधावले याच्या निवेदनावरून अन्वेषण अधिकाऱ्याने सोन्याचे दोन बदाम, सोन्याच्या दोन पेट्या, कानातील सोन्याची फुले, रोख रक्कम रु. ७,२००/- तसेच गुन्ह्यात वापरण्यात आलेली मोटारसायकल जप्त केलेली आहे. तसेच आरोपी क्रमांक ७ अर्थात अर्जदार रुतिक भारत बनसोडे याने दिलेल्या निवेदनावरून गुन्हा करताना वापरण्यात आलेला चाकू जप्त करण्यात आलेला आहे. आरोपी क्रमांक ५ अर्थात अर्जदार हर्षद युवराज बुधावले याने दिलेल्या निवेदनावरून गुन्ह्यात वापरण्यात आलेली बजाज पल्सर कंपनीची क्रमांक फलक नसलेली मोटारसायकल जप्त करण्यात आलेली आहे.

१०. वरील परिस्थितीत आता अर्जदारांकडून आणखी काही जप्त करण्याचे शिल्लक नसल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. अर्जदार दिनांक ०७/०५/२०२६ पासून कोठडीत आहेत. त्यामुळे अन्वेषण अधिकाऱ्यास त्यांच्यासोबत करावयाच्या तपासासाठी पुरेसा कालावधी उपलब्ध झालेला आहे, असे प्रथमदर्शनी दिसून येते.

११. याकामी अर्जदारांची प्रतिज्ञापत्रे पाहता असे दिसून येते की, त्यांच्याविरुद्ध यापूर्वी कोणताही गुन्हा दाखल अथवा प्रलंबित नाही. अन्वेषण अधिकाऱ्यानेदेखील आपल्या म्हणण्यात अर्जदारांविरुद्ध यापूर्वी कोणताही गुन्हा दाखल असल्याचे नमूद केलेले नाही. अन्वेषण अधिकाऱ्याने उल्लेख केलेला गुन्हेगारी पूर्व इतिहास हा आरोपी दादासाहेब बुधावले व संजय बुधावले यांचा आहे. मात्र त्या गुन्ह्यांशी या अर्जदारांचा संबंध असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत नाही. तसेच अर्जदारांना कोणत्याही न्यायालयाने यापूर्वी शिक्षा सुनावल्याचेही दिसून येत नाही.

१२. अर्जदार क्रमांक १ हर्षद हा १९ वर्षांचा असून अर्जदार क्रमांक २ रुतिक हा २० वर्षांचा आहे. ही बाब विचारात घेता त्यांना आणखी काही काळ कारागृहात ठेवण्यात आल्यास त्यांचा सराईत गुन्हेगारांशी निकटचा संपर्क येऊन त्यांच्या भवितव्यावर त्याचा प्रतिकूल परिणाम होण्याची शक्यता आहे. अर्जदारांचे उत्पन्नाचे साधन मजुरी असल्याचे अर्जावरून दिसून येते. तसेच ते कुटुंबातील कर्ते पुरुष असून शेती व मजुरी करून स्वतःचा व कुटुंबाचा उदरनिर्वाह करीत असल्याचे त्यांचे म्हणणे आहे. अशा परिस्थितीत त्यांना आणखी काही काळ कारागृहात ठेवण्याची आवश्यकता प्रथमदर्शनी दिसून येत नाही. अन्वेषण अधिका–याचे असे कथन आहे की, अद्यापी आरोपींची ओळख परेड घेणेची आहे. परंतु केवळ ओळख परेड घेणेची आहे हे कारण जामीन नाकारणेस पुरेसे होणार नाही.

१३. तसेच प्रथमदर्शनी असेही दिसून येते की, अर्जदारांना जामिनावर मुक्त केल्यास त्याचा अन्वेषणावर अथवा अभियोग पक्षाच्या बाजूवर कोणताही विपरीत परिणाम होणार नाही. त्यामुळे अर्जदारांना जामिनावर मुक्त करून त्यांच्यावर योग्य त्या अटी व शर्ती घालणे उचित व न्याय्य ठरेल, अशा निष्कर्षाप्रत मी आलो आहे. म्हणून मी मुद्दा क्रमांक १ चे उत्तर अटी व शर्तीसह होकारार्थी देत असून मुद्दा क्रमांक २ करिता पुढीलप्रमाणे आदेश करीत आहे.

## आदेश

१. अर्जदार हर्षद युवराज बुधावले व रुतिक भारत बनसोडे यांची म्हसवड पोलीस ठाणे, गुन्हा नोंद क्रमांक १०७/२०२६, जो भारतीय न्याय संहिता कलम ३१०(२), ३१२, ३०९(६), ३५१(२), ३(५), ३३१(४) अन्वये दाखल झालेला आहे, त्यामध्ये प्रत्येकी रु. ५०,०००/- चा वैयक्तिक जातमुचलका व तेवढ्याच रकमेचा एक किंवा दोन सक्षम जामीनदार दिल्यास त्यांची जामिनावर मुक्तता करण्यात यावी.

२. अर्जदारांनी या प्रकरणाचा निकाल लागेपर्यंत माण तालुक्याच्या हद्दीत प्रवेश करू नये.

३. अर्जदारांनी या कामीच्या फिर्यादी अथवा अन्य साक्षीदारांशी कोणत्याही प्रकारे संपर्क साधू नये, त्यांच्यावर दबाव आणू नये अथवा ते साक्ष देण्यापासून परावृत्त होतील असे कोणतेही कृत्य करू नये.

४. अर्जदारांनी त्यांच्या वास्तव्याचा संपूर्ण पत्ता व संपर्क क्रमांक अन्वेषण अधिकाऱ्याकडे सादर करावा व अन्वेषण अधिकाऱ्याची पूर्वपरवानगी घेतल्याशिवाय त्यामध्ये कोणताही बदल करू नये.

५. अर्जदारांनी सक्षम प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी यांचे न्यायालयासमोर आवश्यक वैयक्तिक जातमुचलके व जामीनबंधपत्रे सादर करावीत.

६. अर्जदारांनी वरीलपैकी कोणत्याही अटी व शर्तींचा भंग केल्यास अन्वेषण अधिकारी अथवा अभियोग पक्षास जामीन रद्द करण्यासाठी अर्ज करण्याची मुभा राहील.

७. याप्रमाणे जामीन अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

VIDYADHAR BHARGAVRAM KAKATKAR

Digitally signed by VIDYADHAR BHARGAVRAM KAKATKAR
Date: 2026.06.22 17:47:10 +0530

वडूज (विद्याधर बी. काकतकर)
दि.२२/०६/२०२६ अतिरीक्त सत्र न्यायाधीश, वडूज

***CERTIFICATE***

*I affirm that the contents of this P.D.F. file are the same word to word, as per the assigned order.*

*(S.A. Pawar)*
*Stenographer*